गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २४० वा ● शुक्रवार १९ जानेवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 240 | Date : 19/01/2024 | blow :Friday | Page 4 | Price 4



## संपादकीय

### पक्षाची रणनीती निश्चित..

बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांनी आपला वाढदिवस अलीकडेच साजरा केला. यानिमित्ताने त्यांनी पक्षाच्या लखनौमधील मुख्यालयात पत्रकार परिषद घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीविषयी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अपेक्षेप्रमाणे त्यांनी या निवडणुकीत एकाकीच राहण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही ही निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला असून कोणाशी आघाडी करण्याच्या विषयावर आम्ही निवडणुकीनंतर निर्णय घेऊ असे त्यांनी म्हटले आहे. वास्तविक खूप आधीच त्यांनी हा निर्णय जाहीर केला होता. परंतु, मध्यंतरी उत्तर प्रदेशात झालेल्या एका पोटनिवडणुकीत त्यांनी आपल्या पक्षाचा उमेदवार उभा केला नव्हता. त्याचा समाजवादी पक्षाला लाभ झाला होता. त्यामुळे त्या विरोधी इंडिया आघाडीत सामील होऊ शकतील अशा अटकळी बांधल्या जात होत्या. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी विशेषत: काँग्रेसने त्यांच्याविरोधात काहीही भाष्य न करण्याची भूमिका घेतली आहे. समाजवादी पक्षाचे अखिलेशही त्यांच्याविरोधात काही आक्रमक बोलत नाहीत. परंतु, तरीही त्यांनी याही निवडणुकीत एकट्यानेच सामोरे जाण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो त्यांच्या पक्षाला फारसा लाभदायी नाही, हे वास्तव आहे. त्याची मायावती यांनाही कल्पना नाही असेही मानता येणार नाही. परंतु, तरीही त्यांनी स्वबळावर लढण्याचा आपला हेका सोडलेला नाही. त्यांनी स्वतंत्र लढण्याने उत्तर प्रदेशात भाजपलाच लाभ होणार आहे याची त्यांनाही कल्पना आहे, पण तरीही त्यांनी ही भूमिका का घेतली असावी हे मात्र अनाकलनीय आहे. वास्तविक मायावती यांच्या पक्षाचे उत्तर प्रदेशातील वर्चस्व आता कमी कमी होऊ लागले आहे. अलीकडच्या काळात तर त्यांच्या मतांची टक्केवारी जेमतेम दहा-साडेदहा टक्क्यांवर आली आहे. एकेकाळी उत्तर प्रदेशात स्वबळावर सत्ता मिळवणारा हा एक प्रबळ राष्ट्रीय पक्ष होता. परंतु, नंतरच्या काळात या पक्षाला सातत्याने उतरती कळा लागली आहे. वास्तविक मायावतींचा अनुभव दांडगा आहे आणि उत्तर प्रदेशातील राजकारणात या पक्षाला स्वत:चे वेगळे स्थान आहे. परंतु, सततच्या एकटेपणाने त्यांचा प्रभाव आता मावळत चालला आहे. दलित आणि उपेक्षित समाजाचा राजकीय आवाज म्हणून त्यांच्या पक्षाची ओळख होती, तीही आता मावळत चालली आहे. वास्तविक प्रचलित राजकारणात भाजपला त्यांनी प्रथम क्रमांकाचा शत्रू मानणे अपेक्षित होते आणि त्यानुसार आपल्या पक्षाची रणनीती निश्चित करणे अपेक्षित होते. पण त्या मात्र अजून त्यासाठी राजी नाहीत.

# सोलापूरच्या असंघटित क्षेत्रातील कामगारांची गृह स्वप्नपूर्ती



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रत्येकाला घर देण्याचे स्वप्न आहे. त्या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री आवास योजना व अन्य घरकुल योजनांची कामे देशभरात वेगाने सुरु आहेत. यामध्ये बेघर व्यक्तींना लवकरात लवकर घर मिळण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. याचाच एक भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील रे नगर, कुंभारी येथील असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३० हजार घरकुल प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील १५,०२४ घरांचे लोकार्पण शुक्रवार १९ जानेवारी रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे. हा गृह प्रकल्प देशातील सर्वात मोठा गृह प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते दि.९ जानेवारी २०१९ रोजी झाले होते. या निमित्त हा लेख...

सामान्यांच्या घरकुलाचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' राबविण्यात येते. राज्य शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेच्या नागरी प्रकल्पांना गती देऊन, लाभार्थ्यांना विहीत मुदतीत घरे देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचा ग्रामीण भागात मोठा लाभ नागरिकांना मिळत आहे. त्याच पद्धतीने शहरी भागातील नागरिकांना देखील अधिकाधिक लाभ मिळावा हा मुख्य हेतू या योजनेमागे आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील रे नगर येथे असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी हा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) राबवत आहे, त्याला केंद्र सरकारच्या पीएमएवायचे देखील सहाय्य आहे.

**कामगारांचे शहर सोलापूर** कामगारांचे शहर, अशी सोलापूरची ओळख आहे. आधी सूतगिरणीमध्ये काम करणारे आता वस्त्रोद्योग, विडी उद्योग, बांधकाम अशा विविध क्षेत्रात हजारो कामगार सोलापुरात काम करतात. संपूर्ण आयुष्य झोपडपट्टीत घालवणाऱ्या या कामगारांचे स्वत:च्या हक्काच्या घराचे स्वप्न या प्रकल्पातून साकार होताना दिसत आहे. देशातील सर्वात मोठी कामगार वसाहत सोलापुरातल्या रे नगर येथे साकारली आहे.

**रे नगर गृहप्रकल्पाविषयी माहिती** देशातील पहिलाच असंघटित कामगारांसाठीचा हा गृहप्रकल्प आहे. हा प्रकल्प ३६५ एकर जागेवर विकसित होत आहे. या प्रकल्पामध्ये एकूण ८३३ इमारती असून प्रत्येक इमारतीत ३६ घरे आहेत. कचरा उचलणारे, विडी कामगार, बांधकाम कामगार, वस्त्रोद्योग कामगार इत्यादी असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी ही घरकुले आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त पायाभूत सुविधा व बीज भांडवलाकरिता राज्य शासनाने अर्थसाहाय्य दिले आहे. पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सांडपाणी व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांबरोबरच सोलार व डिजिटल पत्ता या सुविधाही पुरविण्यात आल्या आहेत. या प्रकल्पामध्ये उजनी जलाशयातून पाणी पुरवठा, मलशुध्दीकरण केंद्र (डढझ) स्वतंत्र घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा, शाळा, अंगणवाडी, खेळाचे मैदान, रुग्णालय, कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, रुफटॉप सोलर योजना, रेन वॉटर हार्वेस्टिंग या सुविधा प्रत्यक्ष कार्यान्वित करून या घरकुलांचे हस्तांतरण करण्यात येत आहे.

**योजनेची सुरूवात** सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जून २०१५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत, शासन सर्व पात्र कुटुंबांना आणि लाभार्थ्यांना घरे देण्यासाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश (णढड) आणि केंद्रीय नोडल एजन्सी (CNAs) मार्फत अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत करते. शहरीकरण आणि वाढत्या आर्थिक प्रकल्पांमुळे शहरी भागात परवडणाऱ्या घरांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना मदत करणे आणि त्यांना कायमस्वरूपी घरे उपलब्ध करून देणे हा यामागचा उद्देश आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)** देशातील प्रत्येक कुटुंबाला नळजोडणी, शौचालयाची व्यवस्था, २४ तास वीज व पोहोच रस्ता या सुविधांसह पक्के घर असायला हवे, असे विचारात घेऊन प्रधानमंत्री यांच्या सन २०२२ पर्यंत 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली आहे. केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी दारिद्रय निर्मूलन मंत्रालयाने दि. २५ जून २०१५ रोजी सर्वांसाठी घरे या अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना कार्यान्वित करून मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासनाकडून ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन ही योजना राज्यामधील ४०९ शहरांमध्ये लागू करण्यात आली आहे.

**योजनेची सद्यस्थिती** प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) मध्ये केंद्रीय मान्यता व सनियंत्रण समितीने (CSMC) आतापर्यंत १६४२ प्रकल्पांतील ८,८०,९९७ घरकुलांना मान्यता दिलेली आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती (CLSS) अंतर्गत ६,२५,०५० घरकुले विचारात घेता, राज्यात एकूण १५,०६,०४७ घरकुलांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजुरी प्राप्त आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरीता (EWS) ८,००,०९८ घरकुलांना मंजुरी असून त्यापैकी ६,२७,५८१ घरकुले केंद्र हिश्श्याचा निधी मिळण्यास पात्र आहेत. या योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (EWS) ६,२७,५८१ मंजूर घरकुलांपैकी पूर्ण झालेल्या घरकुलांची संख्या जवळपास ४.०३,०४७ आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेची वैशिष्ट्ये** केंद्र शासनाने जाहीर केलेल्या सर्वांसाठी घरे २०२२ या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा आहे. तेथेच पुनर्विकास करणे, कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. खासगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान देणे हे चार घटक समाविष्ट आहेत.


**योजनेच्या अटी व शर्ती** योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे (पती, पत्नी व अविवाहित मुले) पक्के घर भारतामध्ये नसावे. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यांस केंद्र शासनाचे १.५ लक्ष व राज्य शासनाचे १ लाख याप्रमाणे २.५ लक्ष अनुदान प्राप्त होते. केंद्राचे सहाय्य ३० चौ. मी. चटई क्षेत्र पर्यंतच्या आर्थिक दुर्बल घटकांच्या घरकुलांसाठी अनुज्ञेय आहे.

**योजनेसाठी सवलती** प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी राज्य शासनाने शासकीय जमिनी १०० प्रती रु.चौ.मी. या नाममात्र दराने वितरीत करणे, मोजणी शुल्कात ५० टक्के सवलत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न घटकातील लाभार्थ्यांना सदनिकेसाठी एक हजार रूपये मुद्रांक शुल्क, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी २ लक्ष रु. इतके अतिरीक्त या सवलती मंजूर केलेल्या आहेत.

या प्रकल्पामुळे असंघटित कामगारांची हक्काचे घर मिळावे म्हणून गेल्या अनेक वर्षाची प्रतीक्षा संपली आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून मिळालेल्या निधीमधून ही घरकुल पूर्ण झाली आहेत. सर्व सोयीसुविधा पुरवण्यात आलेल्या या गृहप्रकल्पामुळे असंघटित क्षेत्रातील कामगारांची गृह स्वप्नपूर्ती झाली आहे.

**– शैलजा पाटील ,**
**सहायक संचालक,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# विषयाची गांभीर्यने दखल घ्या अन्यथा आंदोलन



रायगड : रायगड जिल्ह्यातील माता रमाई आंबेडकर आवास योजना या योजनेतील अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी काल दिनांक १७ जानेवारी रोजी अलिबाग येथील माननीय सहाय्यक आयुक्त समाज विकास अलिबाग यांची भेट घेतली त्यावेळेस संपूर्ण रायगड मध्ये माता रमाबाई आंबेडकर सावास योजना घरकुल नागरिकांचे गावठाण जागा आहे

त्यांना घरकुल दिले जाणार नाही अशी आठ घातल्यामुळे माता रमाई यांच्या १२५ व्या जयंती वर्षात अशी जाचक अट टाकून घरकुलधारकांना त्यांच्या घरापासून वंचित ठेवणे ही बाब अत्यंत गंभीर आहे आणि म्हणून मी काल रिपब्लिकन सेनेच्या वतीने याबाबतची सर्व माहिती घेण्यासाठी व पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली त्यावेळेस माननीय अधिकारी वंदना कोचरे व सहाय्यक आयुक्त सुनील जाधव साहेबांची भेट झाली याबाबत त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा विषय किती गंभीर झाला आहे याबाबत ची माहिती मिळाली मग संबंधित झेडपी सिओन्सन सोबत संपर्क साधला आणि याबाबतची सविस्तर चर्चा केली त्यांनी मात्र सकारात्मक चर्चा केली येत्या पंधरा दिवसात या विषयाचं गांभीर्य यांच्या लक्षात येतं की नाही ते बघूया अन्यथा आपल्याला आंदोलन करावंच लागेल माझ्यासोबत त्यावेळेस भूषण कासारे सुरेश जाधव आदी कार्यकर्ते सोबत होते.

# स्वामी समर्थांच्या पावन नगरी अक्कलकोटच्या विकासाची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निधीचा पाऊस

## देवेंद्र एक विकास महापुरुष

स्वामी समर्थांच्या पावन नगरी अक्कलकोटच्या विकासाची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सचिन दादा कल्याणशेट्टीवर विकासाचा आशीर्वाद

कर्नाटक महाराष्ट्र सीमेवर दुर्लक्षित असलेले तालुका म्हणजे अक्कलकोट तालुका अनेक दशकांपासून अक्कलकोट तालुका विकासापासून वंचित असलेले तालुक्याला विकासाचा नवीन पर्व मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सुरू झाले आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी हे भाजपा तालुकाध्यक्ष झाल्यापासून अक्कलकोटच्या विकास कामासाठी भरपूर निधी खेचून आणले त्याच्या कामाचे सपाटा बघून अक्कलकोट विधान सभेच्या निवडणुकीत सन २०१९ मध्ये मतदारांनी मोठ्या मतधिक्याने निवडून दिले, हन्नूर सारख्या एका ग्रामीण भागातील सरपंचाला थेट आमदारपदी तालुक्यातील जनतेने निवडून दिल्या बद्दल पुन्हा जोमाने तालुक्याच्या विकास कामाला सुरुवात केले सुरुवातीचे दोन वर्ष हे कोरोनाच्या काळात गेले त्यावेळी तालुक्यातील लोकांचे जीव वाचले पाहिजे यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट येथे ऑक्सीजनसह हॉस्पिटल चालू करण्यात आले होते त्यामुळे गोर गरीब लोकांना उपचार घेण्यास मोठी सोय झाली, लोकांचे आरोग्याची काळजी घेत तालुक्यातील रस्त्याचे कामास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून मंजुरी आणले त्यामुळे अनेक वर्षापासून रस्त्याचे काम मार्गी लागले

अक्कलकोटची नगरी श्री स्वामी समर्थांची गेल्या चार दशकामध्ये विकासापासून वंचित असणारा विधानसभा मतदारसंघ अशी राज्याच्या पटलावरच चर्चा याच तालुक्यामध्ये विधानसभा मतदारसंघांमध्ये. राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये मंत्रिपद भूषवले तरीही विकास काही झाला नाही. तालुक्यामध्ये विधानसभा मतदारसंघांमध्ये असंख्य प्रश्न असताना. नव्या उमेदीचा नवा नेतृत्व २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये तालुक्यातील जनतेने ३७ हजार मताने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टींना निवडून दिल, तालुक्याच्या मरगळलेल्या विकास कामांना नवा मार्ग मिळाला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी नी विधानसभा मतदारसंघातील विकासाचा आराखडा उभा केला. श्री स्वामी समर्थ तीर्थक्षेत्र विकास व शहराचा विकास शासनाकडून निधी मंजूर करून घेतले आहे . शहरातील जनतेच्या सुरळीत रस्ता व्हावे यासाठी शहरातील मेन रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिट करण्यात आले आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या माध्यमातून. शहरातील नागरिकांना नवी दिशा प्राप्त झाली. शहरातील जनतेच्या असंख्य प्रश्न सुटले. समर्थाच्या नगरीमध्ये बस स्थानकाची होणारी दुरावस्था पाहून. चार दशकापासून प्रलंबित असणारा प्रश्न. नवीन बस स्थानकाची निर्मिती करण्याचे ठरवले. उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या समोर ठेवून त्याला मंजुरी मिळून आणले. या कामास सुरुवात करण्याआधी अनेक अडचणी आले यासाठी काही लोकांनी जातीय रंग देण्याचे प्रयत्न केले परंतु विकास कामासाठी एक पाऊल ही मागे न हटता न्यायालयीन लढा लढून आज मोठ्या दिमाखात बसस्थानक भूमिपूजन होत आहे हे तालुक्यातील जनतेला आनंदाचे बाब आहे, नव्याने होणाऱ्या बस स्थानकाचे हे शहरासाठी नवसंजीवनीच आहे. अक्कलकोट शहरातील धार्मिक तीर्थक्षेत्र असताना. ग्रामदैवत म्हणून ओळख असणारे श्री मल्लिकार्जुन मंदिराची पुनर्बांधणीचा निर्णय घेतला त्या कामासाठी ही कोट्यवधी निधी मंजुर करून आणण्यात आले आहे त्याचीही पायाभरणी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे. विकास कामाबरोबर धर्म ही महत्त्वाचा आहे धर्माची विकास ही महत्त्वाची आहे. असा असताना वंचित मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी सामाजिक न्याय विभागाचे माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विकास निधी अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये बुद्ध विहाराची निर्मिती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भावनांची निर्मिती. डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, अभ्यासिका केंद्र या बरोबर सिमेंट कॉंक्रिट रस्ता, पेव्हर ब्लॉक, गटार यासाठी करोडो रुपयांची निधी मंजूर करून आणण्यात आली आहे . अक्कलकोट स्टेशन, दुधनी स्टेशन, येथे सव्वाशे कोटीची उड्डाणपुलाची निर्मितीसाठी निधी मंजूर केले आहे . दुधनीसाठी अत्यंत महत्त्वाचा हा विषय असताना उड्डाणपुलाची निर्मिती हा विकासाचा सगळ्यात महत्त्वाचा भाग आहे असं समजला जाईल.कारण सदर रस्ता अक्कलकोट गाणगापूर या तीर्थक्षेत्र जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे, अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा विषय म्हणजे. एकरुख जलसिंचन उजनी धरणाचे पाणी कुरनुर धरणाला आणण्यासाठी अधिवेशामध्ये आवाज उठवून ते काम फायनल केले आहे व गेल्या अधिवेशनात लक्षवेधी विषय मांडून पुरवणी कामास मंजुरी करून घेतले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली. कोट्यावधी रुपयाची



निधी उपलब्ध करून. तालुक्याचा अत्यंत कळीचा विषय मार्गी लावण्यात आला. केवळ निधी उपलब्ध केलं नाही. तर आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी हा विषय विधानसभेमध्ये मांडला. म्हणून कुरनूर धरणाला उजनी धरणाचे पाणी येऊ शकले. या विकासाच्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकास महापुरुष म्हणूनच तालुक्यामध्ये त्यांची गणना होऊ लागली. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून अक्कलकोट तालुक्यातील व विधानसभेतील रस्त्याचे प्रश्न पूर्णपणे चित्र पालटले आहे. कोट्यावधीची निधी उपलब्ध करून. विधानसभा क्षेत्रातील संपूर्ण शहर व ग्रामीण उत्कृष्ट रस्त्याची सोय झालेली आहे. याचे पूर्ण श्रेय महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांना जाते. श्री स्वामी समर्थांच्या या नगरीचा विकास कामांमध्ये लागलेली प्रगती ती उत्तर उत्तर वाढत जाऊ. असंच म्हणावे लागेल. हे होणारच कारण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एक विकास महापुरुष आहेत. त्याला जोड आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी आहेत. यापुढे ही दादा अक्कलकोटच्या विकास कामासाठी प्रयत्नशील असणारच आहेत परंतु अक्कलकोट तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या प्रगतीसाठी अक्कलकोट येथे औद्योगिक विकास महामंडळ ( एमआयडीसी ) हे आणल्यास अक्कलकोट तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध होऊ शकतो यासोबत मेडिकल कॉलेज,इंजिनिअरिंग कॉलेज हे देखील चालू करण्यासाठी भविष्यात दादा प्रयत्न करावे अशी तालुक्यातील जनतेची भावना आहे

दादा आपल्या पुढील विकास कामासाठी व वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

**लेखक – गौतम बाळशंकर ( उपसंपादक दैनिक यश सिध्दी न्युज ) ग्रामपंचायत सदस्य हन्नूर**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वंचित –रिपाइं एकत्र आल्यास महाराष्ट्राचे राजकारण बदलणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



मुंबई : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते प्रकाश आंबेडकर आणि माझ्या नेतृत्वातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) एकत्र येण्याची गरज आहे. आम्ही एकत्र आलो तर महाराष्ट्राचे राजकीय चित्र बदलू शकतो. आमच्या एकजुटीतून राज्याचा मुख्यमंत्री आमचा झाल्याशिवाय राहणार नाही असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी अँड.प्रकाश आंबेडकर यांना ऐक्याची साद घालण्याचा प्रयत्न अकोल्यात केला.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अकोला जिल्हयाच्या वतीने अकोला शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाटयगृहात आयोजित गायरान जमीन अतिक्रमण हक्क परिषदेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ना.रामदास आठवले बोलत होते. अँड. प्रकाश आंबेडकर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातु असून त्यांचा मला आदर आहे. अकोला जिल्हा पुन्हा रिपब्लिकनमय करायया आहे. दलित पँथरच्या माध्यमातुन अकोला जिल्हयात अनेक आंदोलने करण्यात आली होती. आम्हाला पुन्हा हा जिल्हा रिपब्लिकनमय करायचा आहे. असा निर्धार ना. रामदास आठवले यांनी यावेळी बोलून दाखविला.

रिपाइं (आठवले) जिल्हाध्यक्ष सुनील अवचार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गायरान जमीन अतिक्रमण हक्क परिषदेला पक्षाचे प्रदेश सहसंघटन सचिव अशोक नागदेवे, सुमित वजाळे, पश्रि्चम विदर्भ अध्यक्ष मोहन भोयर, जिल्हा महासचिव जे.पी.सावंत, अमरावती जिल्हाध्यक्ष प्रकाश बनसोड, महेंद्र मानकर प्रकाश गजभिये, बुध्दभूषण गोपनारायण ;अर्चना धांडे; आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आकाश हिवराळे यांनी केले.

# वंचित बहुजन आघाडी प्रदेश उपाध्यक्ष अँड.अरुण जाधव यांचे अक्कलकोट भेट, विविध सामाजिक विषयावर केले चर्चा

अक्कलकोट/प्रतिनिधीः बाळासाहेब आंबेडकर यांचे अत्यंत विश्र्वासू , वंचित बहुजन आघाडीची मूलक मैदानी तोफ ज्यांच्या भाषणाने विरोधकांच्या मनात धडकी भरते, वंचित बहुजन आघाडी प्रदेश उपाध्यक्ष अँड. अरुण अण्णा जाधव यांची अक्कलकोट येथे भेट देऊन तालुक्यातील विविध समस्या, सामाजिकसह राजकीय विषयावर चर्चा करण्यात आले यावेळी तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले




वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी अक्कलकोट तालुक्यात घडलेल्या अनेक सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली याच दरम्यान घोळसगाव येथील घटनेची चर्चा तेथील कार्यकर्त्यांनी सविस्तरपणे अरुण अण्णा जाधव यांना सांगितले

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक आघाडी तालुका अध्यक्ष शीलामणी बनसोडे,

शिव बसव डॉ.बी.आर आंबेडकर सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप मडीखांबे, सम्यक विद्यार्थी आंदोलन मा.तालुका अध्यक्ष रविराज पोटे, युवक आघाडी शहर अध्यक्ष संदीप बाळशंकर, संघटक बबन गायकवाड, युवक आघाडी तालुका उपाध्यक्ष विजय भालेराव, ब्यागेहळी शाखाध्यक्ष गंगाराम गायकवाड, दत्ता मडीखांबे, शिवा नाटेकर, मिरजगीचे पाटील गेनू पाटील, शाखा उपाध्यक्ष मुल्ला, मिलिंद गायकवाड, विकास वाघमारे, आशिष गायकवाड आदी सह कार्यकर्ते उपस्थित होते




# सौ सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयात १० वी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी,कन्नड व सेमी इंग्रजी विद्यालयात इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षेला सामोरे जाताना त्यांच्यात अत्मविश्र्वास निर्माण व्हावे, वेळेचे नियोजन, प्रश्र्नपत्रिकेचे स्वरूप, आदर्श उत्तरपत्रिका कशी असावी याबाबत मार्गदर्शन मिळावे म्हणून दि. १७ ते २४ जानेवारी २०२४ या कालावधीत मार्गदर्शन शिबीराचे अयोजन करण्यात आले आहे.या शिबीराचे उदघाटन संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी हे उपस्थित होते.

या शिबिरास मार्गदर्शन करण्यासाठी तालुक्यातील अनुभवी विषयतज्ञ उपस्थित राहणार आहेत. दि.१७ रोजी दु.३ वा. अनंत चैतन्य प्रशालेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक व मराठी विषयतज्ञ श्री बीपूजी निंबाळकर , दि. १८ रोजी दु.३ वा.श्री बसय्या हिरेमठ (इंग्रजी) महांतेश्र्वर प्रशाला इब्राहिमपुर, दि.१९ रोजी दु.३ वा. श्री रमेश येणगुरे (हिंदी) शिवचलेश्र्वर हायस्कूल मैंदर्गी, दि.२० रोजी स.१० वा. श्री शिवानंद पुजारी (गणित) सेवानिवृत्त पर्यवेक्षक सौ. सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालय, दि.२३ रोजी दु.३ वा. श्री रमेश उमाटे (विज्ञान) मंगरुळे हायस्कूल, दि. २४ रोजी दु.३ वा.श्री बाळासाहेब बनसोडे (समाजशास्त्र) ग्रामीण विद्या विकास विद्यालय चपळगाव यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार आहे. या शिबिराचे कौतुक संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सीइओ सौ रूपाली शहा,ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी, संचालक मल्लिनाथ मसुती यांनी केले. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी निखिल भालेराव, खंडेराव घाटगे,सुरेश रुग्गे, मनिषा शिंदे तसेच सर्व विषय शिक्षक प्रयत्न करीत आहेत. या शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

# नंदनवनची उपयोगीता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करा : पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची सूचना

## सोलापूर-विजयापूर महामार्गावरील वन विभागाच्या नंदनवनचे लोकार्पण

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर-नांदणी महामार्गावर वन विभागाच्या माध्यमातून साकारण्यात आलेले नंदन वन अतिशय सुंदर पद्धतीने विकसित केले आहे. या प्रकल्पाला जास्तीत जास्त सोलापूरकरांनी भेट द्यावी यासाठी उपयोगिता वाढविण्यावर भर द्यावा, अशी सूचना पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज केली. विजयापूर-सोलापूर महामार्गालगत नांदणी येथे वन विभागाने साकारलेल्या नंदनवन उद्यानाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते आज झाले. यावेळी आमदार सुभाषबापू देशमुख, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, सरपंच शिवानंद बंडे, डॉ. चनगोंडा हविनाळे, सहायक पोलिस निरीक्षक प्रशांत हुल्ले यांच्यासह नांदणी गावचे ग्रामस्थ आणि वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, सोलापूर-विजयापूर महामार्गालगत पहिल्या टप्प्यात विकसित करण्यात आलेले नंदनवन उद्यान उत्तम झाले आहे. उर्वरित टप्प्यातील काम जलदगतीने पूर्ण करावे. तसेच, उद्यानातील वनराईच्या संवर्धनासाठी वन विभागाने तातडीने प्रस्ताव तयार करुन पाठवावा. त्याला तात्काळ मान्यता देण्यात येईल. तसेच, या उद्यानाची उपयोगिता वाढावी यासाठी शाळांच्या सहली आयोजित कराव्यात. सोलापूरकरांना आकर्षण वाटेल, असे उपक्रम उद्यानात राबवावेत, अशा सूचनाही श्री. पाटील यांनी यावेळी केल्या. श्री. पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश झपाट्याने प्रगती करत आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून आर्थिक दुर्बलांना संपूर्ण देशात तीन कोटींपेक्षा




जास्त घरे बांधून देण्यात आली. त्यापैकी ३० हजार घरे एकाच ठिकाणी बांधण्यात येत आहेत. त्यापैकी १५ हजार घरे तयार आहेत. उद्या दिनांक १९ जानेवारी रोजी पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण होणार आहे. देशातील अशाप्रकारे पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून घरे उपलब्ध होणारा हा पहिलाच प्रकल्प आहे. हा प्रकल्प संपूर्ण देशाला वेगळीच ओळख निर्माण करुन देईल, असा विश्र्वास याप्रसंगी व्यक्त केला.

यावेळी आमदार सुभाषबापू देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सोलापूरच्या निसर्ग सौंदर्यात भर घालण्यासाठी नांदणी येथे वन उद्यान उभारण्यात आलं आहे. संपूर्ण तालुक्यातील नागरिक आणि पर्यटकांसाठी आपले नांदणी वन उद्यान आता खुले झाले आहे. नागरिकांना नैसर्गिक सौंदर्यासह आता या उद्यानाचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे, असा विश्र्वास व्यक्त केला. लोकार्पणानंतर श्री. पाटील यांनी उद्यानाची संपूर्ण पाहाणी केली. यावेळी उद्यानाच्या प्रवेशद्वारावर साकारण्यात आलेल्या शिल्पाचे कौतुक केले. तसेच, वृक्षारोपण करुन वन संपदेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचा संदेश दिला.

# जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी शांतता पाळावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलपूर/प्रतिनिधी:श्री शिवयोगी सिध्दरामेश्र्वर दुसऱ्या दिवशीच्या यात्रा दि .१५ जानेवारी २०२४ रोजीच्या होम व भाकणूक मिरवणूकीप्रसंगी बैलगाडीच्या रथात श्री शिवयोगी सिध्दरामेश्र्वर व महात्मा बसवेश्र्वर महाराज यांचे प्रतिमा ठेवून मिरवणूक निघालेली होती. त्या मिरवणूकीमध्ये अज्ञात समाजकंटकाने महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमेला पेपर लावून झाकून ठेवण्यात आले. जसे मिरवणूक पुढे पुढे जात होते. त्या दरम्यान बसवेश्र्वरांचे प्रतिमा मिरवणूकीमधून काढून टाकण्यात आली. या प्रकरणी मंदीर पंच कमिटीकडे विचारणा केली असता, याबाबत आम्हाला कोणतीच माहिती नाही, असे सांगण्यात आले, असे निवेदन राष्ट्रीय लिंगायत महासंघ भारत संघटनेकडून जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहे. उपरोक्त घटनेमुळे लिंगायत समाजामध्ये रोष निर्माण झालेला आहे. तरी असे कृत्य करणाऱ्या सर्व संबंधिताची पोलीस विभाग सखोल चौकशी करेल व संबंधिता विरोधात कडक कारवाई करण्यात येईल. तरी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होऊ नये यासाठी सर्वांनी शांतता पाळावी असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

सोलापूर जिल्हा हा शांतताप्रिय जिल्हा असून जिल्ह्यात आज पर्यंत सर्व सण, उत्सव, समारंभ व मिरवणुका अत्यंत शांततामय वातावरणात पार पडत असतात, याही पुढे असेच शांततामय वातावरण रहावे, असे आवाहन सर्व समाजातील नागरिकांना करत असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# चेन्नई सुरत ग्रीनफिल्ड हायवेचा बाधित शेतकऱ्यांची अक्कलकोट तहसील कार्यालय समोर बोंबाबोंब आंदोलन


शिरवळ : हणमंत घोदे : बहुचर्चित चेन्नई सुरत हायवेचा वाद दिवसेंदिवस चिघळत चालला आहे.मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्र्यांचे आदेश होऊनही शासनस्तरावरुन बैठक लागत नाही बाधित शेतकऱ्यांची प्रश्र्न कोणीही ऐकून घायला तयार नाही ही एक शोकांतिका आहे.परंतु शुक्रवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सत्तेतील मंत्री अक्कलकोट येथे येत असुन बाधितांसोबत त्यांचा संवाद होण्याकामी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पुढाकार घ्यावा.या मागण्यांसह अक्कलकोट तहसील कार्यालयासमोर ग्रीनफिल्डच्या बाधित शेतकऱ्यांनी बोंबाबोंब आंदोलन केले.




# पंढरपूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये २ हजार ९४५ इतक्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी

## अभिलेखांचे मराठी भाषेमध्ये रुपांतर करण्याचे काम प्रगतीपथावर : तहसिलदार सुशिल बेल्हेकर

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये २ हजार ९४५ इतक्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी आढळून आलेल्या आहेत. सदर अभिलेखांचे प्रथम स्कॅनींग करण्यात येणार असुन, मराठी भाषेमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित केल्यानंतर स्कॅनींगच्या पी.डी.फ फाईल संबंधीत गांवच्या नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येणार आहे. सदरचे कामकाज प्रगतीपथावर चालू असल्याचे तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी सांगितले.



पंढरपूर तालुक्यातील सर्व गावांमध्ये मोडी लिपीतील कुणबी नोंदीचे सर्व अभिलेख ड. सुधीर रानडे, ड अशुतोष बडवे, ड संतोष घाडगे, या मोडी लिपी जाणाकारांमार्फत तपासलेल्या आहेत. त्यामध्ये पंढरपूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये २९४५ इतक्या मोडी लिपीतील कुणबी नोंदी आढळून आलेल्या आहेत. सदरचे अभिलेयांचे कामकाज प्रगतीपथावर चालू असुन, त्याची पी.डी.एफ किंवा नक्कल सद्यास्थितीस उपलब्ध करुन देणे शक्य नाही. याबाबत इंटरनेट मिडीयावर प्रसिध्द झालेल्या कोणत्याही बातम्यांवर नागरिकांनी विश्र्वास ठेवू नये. तसेच तालुक्यातील नागरिकांना कुणबी दाखला नोंदीबाबत प्रसिध्द प्रत्रकान्वये व ग्रामस्तरावर प्रशासकीय यंत्रणेकडून कळविण्यात येईल. तालुक्यातील शोधमोहीमेबाबत जिल्हाधिकारी कुमार आर्शिवाद व उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे विहीत कालावधीत शोधमोहिम राबविलेली आहे. या शोधमोहिमेमध्ये पंढरपूर तालुक्यातील सन १९६० पुर्वीची एकुण ८४ गावांमधील (सध्याची ९५ गावे) सर्व अभिलेखांतील नोंदीची तपासणी करणेत आली. त्यामध्ये एकुण ५,३१,०४१/- इतक्या मराठी भाषा व मोडी लिपीतील नोंदी तपासण्यात आल्या. त्यापैकी मौजे भोसे, कासेगांव, भाळवणी, अजनसोंड, तावशी या गावांमध्ये मराठी भाषेतील ४७९ कुणबी नोंद आढळून आलेल्या आहेत. सदर आढळून आलेल्या नोंदींच्या अभिलेखांचे स्कॅनिंग करुन त्याची पी.डी.एफ. गावातील सर्व रहिवाशांना ऑनलाईन प्रणालीवर शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या असल्याचे तहसिलदार बेल्हेकर यांनी सांगितले.

# राजराजेश्र्वरी प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात

सोलापूर/प्रतिनिधी : विनायक नगर येथील राजराजेश्र्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत स्काऊट गाईड चळवळीच्या खरी कमाई उपक्रमांतर्गत बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. प्रथम स्काऊट गाईडचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन नेताजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवीशंकर कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माता पालक सदस्य शीतल पवार, आकाशवाणीच्या निवेदिता कविता वाघमारे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्र्वर म्हेत्रे उपस्थित होते.

या बाल आनंद मेळाव्यात ऐंशी स्टॉल उभारण्यात आले होते. सुशीला, भेळ, कचोरी, शाबूत वडा,वडापाव, सँडविच, ढोकळा, पावभाजी, कोबी मंचुरियन, नूडल्स, संगम वडा, मसाला पापड, कडक पोहे, आप्पे,मोदक, शेंगा लाडू, सुगंधी दूध,शरबत, चहा असे विविध पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करुन विक्री केली.या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी सहा ते सात हजार रुपये गुंतवणूक केले होते.यामधून चार हजार रुपयांचा फायदा झाला.या मेळाव्यात विद्यार्थी हेच मालक व ग्राहक बनले होते.विद्यार्थ्यांना खरी कमाईचे महत्व लक्षात यावे.उद्योग,धंदा,दैनदिन व्यवहार, खरेदी-विक्री, नफा- तोटा यासंबंधीची माहिती व्हावी यासाठी बाल आनंद मेळावा घेतल्याचे मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी सांगितले. आकाशवाणीच्या निवेदिका वाघमारे म्हणाले, शाळेने विद्यार्थ्यांना कौशल्य विकास अभ्यासक्रमाची ओळख करुन दिली.कामाचा अनुभव करुन दिले.मेहनतीने पैसे कसे कमवायचे.कष्टाची कमाई



खरी कशी असते याबाबत मार्गदर्शन केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी स्काऊट गाईड प्रमुख हणमंत कुरे, श्रेयस बिराजदार,बजरंग शिरसाट, अमोल गुड्डेवाडी,किरण साळुंखे महेंद्र वाघमारे रविकांत पोतदार, सुजाता फुलारी, शितल चमके उज्वला भांड, सचिन होटगे आदींनी परिश्रम घेतले.